पुणे शहर पोलीस

# दर्पण

डिसेंबर २०१९

# अभिप्राय...

प्रती,

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक
मुंढवा पोलीस ठाणे ,पुणे शहर.
यांना सविनय सादर

रिपोर्ट :- पी.एस.भोसले, पो.ना.४४, मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर
यांजकडुन विनंती पुर्वक की,

विषय :- दर्पण पुस्तकाबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मी मुंढवा पोलीस ठाणे येथे ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्य करीत असताना नागरीक आपले विविध तक्रारी घेऊन पोलीस ठाणे येथे येत असतात. ठाणे अंमलदार कक्षात नागरीक बसलेले असताना तेथे ठेवण्यात आलेले दर्पण पुस्तक घेऊन ते त्यामधील पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामगिरी बाबत वाचुन पोलीसांचे कौतुक व समाधान व्यक्त करीत असतात. पुणे पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाची माहिती दर्पण पुस्तकामुळे नागरीकांस मिळते त्याबाबत नागरीकांनी कौतुक व समाधान व्यक्त केल्यामुळे आम्हास चांगले काम करण्याची स्फुर्ती मिळते.

मा.सादर व्हावे.
ता.१८/०६/२०१९

पी.एस.भोसले
पोलीस नाईक ४४
मुंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर

---

दि-१३/०६/२०१९

नाव- [illegible]

विषय-: दर्पण पुस्तिका २०१४ बाबत अभिप्राय...

महोदय,

मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी

[illegible]

आपला

[illegible]

# कारवाई

महाराष्ट्र टाइम्स – दि. १ डिसेंबर, २०१९

# सोन्याची 'मलई' खाणारे जेरबंद

## दूधविक्रीच्या व्यवसायाच्या आधारे काढला माग; साडेसहा लाखांचे दागिने जप्त

Shrikrishna Kolhe
@timesgroup.com
Tweet : @ShrikrishnaMT




पुणे : दुधाचा धंदा आणि नावाला दुधाची विक्री करण्याच्या बहाण्याने 'ते' सोसायट्यांमध्ये प्रवेश करीत असत. फ्लॅटधारकांचा विश्वास संपादन करून घरातील ज्येष्ठ नागरिकांचे दागिने पळवून 'मलई' खाणाऱ्या टोळीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. आरोपींच्या मुळाशी पोहोचण्यासाठी त्यांच्याच व्यवसायाचा आधार घेण्याचे पोलिसांनी ठरवले आणि 'ऑपरेशन' राबविले. सोसायट्यांतील 'सीसीटीव्ही' फुटेज आणि अन्य माहितीच्या आधारे मिळालेला सुगावा घेऊन पाळत ठेवून अलगद टोळीच्या म्होरक्यांना चौघांच्या टोळीला जेरबंद केले.

सहसा दूध आणि नावाला दूध विक्रीच्या बहाण्याने काही व्यक्ती सोसायटीत प्रवेश करीत होते. एकदा सोसायटीत प्रवेश केल्यानंतर ज्येष्ठ नागरिकांना हेरून त्यांना बोलण्यात गुंतवून त्यांचा विश्वास संपादन करण्याचे काम ही मंडळी करीत असत. 'आमच्या घरी लग्न आहे, त्यासाठी सोन्याचे दागिने बनवायचे आहेत. तुमच्या जवळील दागिने दाखवा. आमचे आई-वडील बाहेर थांबले असून, त्यांना दागिने दाखवून येतो,' असा बहाणा करून दागिने घेऊन पोबारा करण्याची त्यांची पद्धत होती. अशा पद्धतीने एकापाठोपाठ एक सहसा गुन्ह्यांची मालिकाच सुरू झाल्याने पोलिस चक्रावले होते. या प्रकरणी शहरातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल होत होते. अखेर अशा प्रकारच्या गुन्ह्यांना पायबंद घालून गुन्हेगारांना जेरबंद करण्याची कामगिरी गुन्हे शाखेच्या युनिट एकला देण्यात आली. युनिटच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिसरातील 'सीसीटीव्ही'चे पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. एका सोसायटीच्या 'सीसीटीव्ही'मध्ये नेमके गुन्ह्यातील आरोपी 'कैद' झाले होते. त्यांची माहिती काढण्याचे काम हाती घेण्यात आले. यामध्ये गुन्हेगारांचा दूध विक्रीचा पूर्वीचा व्यवसाय असल्याचे पोलिस कर्मचारी योगेश जगताप, मल्लिकार्जुन स्वामी आणि सुधाकर माने यांना समजले.

संबंधित गुन्हेगार म्हशीच्या दुधाच्या विक्रीची विक्री करून पलायन करीत असल्याचे आणि बारामतीजवळील बांदलवाडी परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती समोर आली. त्यानुसार, अतिरिक्त पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक दिनेश पाटील यांच्या पथकाने सापळा रचून अशोक उर्फ काट्या विश्वनाथ गायकवाड (वय ४७), नवनाथ विष्णू जाईकर (वय २२), सचिन पोपट जाईकर (वय २२, दोघे रा. बांदलवाडी, ता. बारामती) या तीन आरोपींना जेरबंद केले. त्यांच्याकडे चौकशी केली असता सुनील सोमनाथ जाईकर (वय ३०, रा. विठ्ठलवाडी, ता. बारामती) यांच्या मदतीने गुन्हे केल्याची माहिती त्यांनी पोलिसांना दिली. त्यानंतर सुनीललाही पकडण्यात आले. आरोपींकडून समर्थ, अलंकार, भारती विद्यापीठ, मार्केट यार्ड, चिंचवड आणि निगडी येथील पोलिस ठाण्यांतर्गत सात गुन्हे उघडकीस आले आहेत. गुन्ह्यातील सहा लाख ५४ हजार रुपयांचे दागिने, तीन दुचाकी, मोबाइल असा एकूण दहा लाख ७० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. आरोपी अशोक उर्फ काट्या याच्यावर सोनेचोरीचे तीन गुन्हे दाखल आहेत.

### ज्येष्ठांना गोड बोलून दागिन्यांची हेराफेरी

सहसा दूध आणि भाजीची विक्री करून पलायन होऊन गुन्हे करणारे आरोपी एकमेकांचे नातेवाइक आहेत. बारामतीहून ते सकाळच्या वेळी पुण्यात येत असत. मोठ्या सोसायट्यांमध्ये प्रवेश करून ज्येष्ठ नागरिक असलेले घर शोधत असत. घरातील ज्येष्ठांसमवेत दूध, दूध विक्रीच्या बहाण्याने हवापाण्याच्या गप्पा करून त्यांचा विश्वास संपादन करत. 'तुमची तुमच्याकडील दागिने दाखवा; सोन्याचे आम्हालाही तयार करायचे असून, आई-वडिलांना दाखवून येतो,' अशी थाप मारून दागिने घेऊन पोबारा करण्याची त्यांची पद्धत होती.



सकाळ – दि. ९ डिसेंबर, २०१९

# मद्यपींची उतरविली ‘नशा

## ‘ड्रंक अँड ड्राइव्ह’अंतर्गत १३ हजार वाहनचालकांवर कारव

पांडुरंग सरोदे :
@spandurangSakal

पुणे, ता. ८ : मद्यपान करून वाहने चालवीत स्वतःसह दुसऱ्यांचा जीव धोक्यात घालणाऱ्या १३ हजार वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा दुप्पट मद्यपी वाहनचालकांवर ‘ड्रंक अँड ड्राइव्ह’अंतर्गत पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

शहराच्या वेगवेगळ्या भागांत होणाऱ्या अपघातांमध्ये मद्यपान करून वाहने चालविणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय आहे. यामुळे गंभीर अपघात होऊन संबंधित वाहनचालकांसह इतरांचा जीवदेखील जाण्याची दाट शक्यता असते. या पार्श्वभूमीवर अपघात रोखण्याचे आदेश पोलिस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम यांनी काही दिवसांपूर्वी आदेश दिले होते. त्यानुसार वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांकडून मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करण्यात येत आहे. रात्रीच्या वेळी शहराच्या रस्त्यांवर विशेष मोहीम राबवून वाहनचालकांवर कारवाई व येत आहे. ‘ड्रंक अँड ड्राइव्ह’

पान ३

### कारवाईमुळे झालेले परिणाम

- काही प्रमाणात अपघात घटले
- बेदरकारपणे वाहने चालविण्यावर नियंत्रण
- चालकासह इतरांना असणारा धोका कमी झाला
- पोलिसांकडून खटले भरण्याची वाहनचालकांना धास्ती



### शहरामध्ये घडलेल्या अपघाताच्या घटना

| वर्ष | अपघातांची संख्या | पादचाऱ्यांच्या मृत्यूची संख्या |
|---|---|---|
| २०१८ | २०४ | २१५ |
| २०१९ | १५३ | १५९ |

(ऑक्टोबरपर्यंतची आकडेवारी)



पुण्यनगरी – दि. ३१ डिसेंबर, २०१९

# वाहतूकच्या कारवाईमुळे वाहनचालक जागरूक

## सोलापूर रस्ता : वैदूवाडी चौक-शेवाळेवाडी दरम्यान वाहतूक सुरळीत होण्यास मदत



> वाहतूक विभागाकडून फक्त कारवाई केली जात नाही, तर वाहनचालकांना समज दिली जात आहे. कारवाईमध्ये सातत्य असल्याने त्याचा परिणाम चांगला दिसून येत आहे. वाहतूक सुरळीत होऊन नागरिकांचा मनस्ताप कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत, ही जमेची बाजू आहे.
>
> – महेश शिंदे, हडपसर

पुणे : प्रतिनिधी

सोलापूर रस्त्यावर वैदूवाडी चौक ते शेवाळेवाडी दरम्यान वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर वाहतूक विभागाने धडक कारवाई सुरू केली आहे. त्याचा परिणाम वाहतूक सुरळीत होऊन अपघाताचे प्रमाणही कमी झाल्याचे दिसत आहे. विरुद्ध दिशेने येणारी वाहने, वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या अवैध प्रवासी वाहनांसह खासगी ट्रॅव्हल्सवर धडक कारवाईची मोहीम सुरू केली आहे. त्यामुळे वाहतुकीला रस्ता खुला झाला असून, वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांसह वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले.

पोलीस आयुक्त के. वेंकटेशम व पोलीस उपायुक्त प्रसाद अक्कानवरू यांच्या मार्गदर्शनाखाली हडपसर वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र जाधव, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर म्हेत्रे, सीताराम शेलार, अशोक शिंदे, गजानन भोसले, सुनील खोरकर, तेज भोसले, दिनेश टपके, मनोज ठाकरे, संतोष आढाव, केशव चणवे, आशिष गरुड, संजयकुमार जगताप, राजेंद्र ननवरे, नाथराम काळे, अजित नाईक, गोरक्ष गायकवाड यांच्या पथकाने विरुद्ध दिशेने येणारी वाहने, वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या खासगी प्रवासी वाहनांसह ट्रॅव्हल्स, विना हेल्मेट, जॅमर, नो पार्किंगमधील वाहनांवर दंडात्मक कारवाई सुरू केली आहे. तसेच पदपथ आणि रस्त्यावरील फेरीवाल्यांवरही कारवाईचा बडगा उगारला आहे.

जाधव म्हणाले की, वाहतूक विभागाने सुरू केलेल्या कारवाईमुळे वाहनचालकांमध्ये नियमाविषयी जागरूकता निर्माण होत आहे. दुचाकीचालकांना हेल्मेटविषयीचे महत्त्व सांगितल्याने त्याचाही चांगला परिणाम दिसून येत आहे. हडपसर वाहतूक विभागाने ई-चलनच्या ५८ हजार १४३ केसेस दाखल केल्या असून, डीडी, अवैध पार्किंग, हेल्मेट ई-चलन, लायसन्स शिवाय, ट्रिपल सिट, जॅमर, नो पार्किंग, विरुद्ध दिशेने येणारी वाहने, लायसन्स नसणे, सिटबेल्ट, लक्झरीवरील कारवाई, महापालिका केसेस ४९ आणि १६ गुन्हे, टेंटेड ग्लास, सिग्नल जंपिंग, मोबाइल टॉकिंग, सायलेन्सर, रश ड्रायव्हिंग, फॅन्सी नंबर, पालिका पावती, रिक्षांवरील कारवाई आणि नो एंट्री, जड वाहनांवरील अशी एकूण ५८ हजार १४३ केसेस दाखल करून दोन कोटी १५ लाख ९६ हजार ७०० रुपये दंड आकारला आहे.

वाहनचालकांमध्ये नियमाविषयी समज देऊन जागरूकताही वाहतूक विभागाकडून केली जात आहे. त्याला वाहनचालकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. वैदूवाडी चौक ते मांजरी फाटा दरम्यानच्या वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केल्यामुळे वाहतूककोंडी कमी झाली असून, वाहतूक सुरळीत झाली आहे. तसेच अपघाताचे प्रमाणही कमी झाल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांकडून येत असल्याचे जाधव यांनी सांगितले.

**पुढारी** – दि. १७ डिसेंबर, २०१९

# तडीपारीचा भंग केलेले तीन सराईत गुन्हेगार जेरबंद

## गुन्हे शाखेची कारवाई

**पुणे: प्रतिनिधी**

गुन्हे शाखा युनिट एक व दोनच्या पथकाने संयुक्त कारवाई करत तडीपारीचा भंग केलेल्या तीन सराईतांना जेरबंद केले आहे. तिघांवरदेखील तडीपारीचा भंग केल्याप्रकरणी कारवाई करून संबंधित पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. पुणे शहर व शहराच्या हद्दीलगत गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबरोबरच सराईत गुन्हेगारांवर पाळत ठेवण्याचे आदेश गुन्हे शाखेला आहेत. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने बाबा रघुनाथ सरोदे (२४, रा. कामगार पुतळा) या तडीपार गुन्हेगारास जेरबंद केले. त्याच्या चौकशीत त्याने मागील सहा महिन्यांपासून तडीपार असल्याचे सांगितले.

तर दुसऱ्या एका कारवाईत अक्षय राजेंद्र जोंजाळे (वय. ६२, यशोदा हौसिंग सोसायटी, शिवाजीनगर) यास अटक करण्यात आली. तो तडीपार असून तडीपारीचा भंग करून कामगार पुतळा येथे आला होता. तसेच गुन्हे शाखा युनिट दोनच्या पथकाने केलेल्या कारवाईत समीर नईमुद्दीन अन्सारी (२९, रा. बालाजीनगर, धनकवडी) याला पुलगेट येथील बसथांब्यावर अटक केली. त्याच्यावर कारवाई करून शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तोदेखील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहे.

ही कारवाई युनिट दोनचे पोलिस निरीक्षक महेंद्र जगताप, पोलिस उपनिरीक्षक प्रतापसिंह शेळके, सहायक पोलिस फौजदार शेखर कोळी, पोलिस नाईक यशवंत खंदारे, तर युनिट एकच्या वतीने पोलिस निरीक्षक राजेंद्र मोहिते, उपनिरीक्षक उत्तम बुदगुडे, सहायक पोलिस फौजदार वसावे, पोलिस हवालदार योगेश जगताप, अशोक माने, उमेश काटे, पोलिस नाईक सचिन जाधव यांच्या पथकाने केली.

**लोकमत** – दि. ६ डिसेंबर, २०१९

# दुचाकीसह मोबाईल चोरी करणारे सराईत त्रिकूट जेरबंद

पुणे : मोबाईल व वाहनचोरी करणाऱ्या तिघा सराइतांना वानवडी पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्याकडून १३ दुचाकी, ४५ मोबाईल असा तब्बल ७ लाख ५१ हजार ८०० रुपयांचा माल जप्त केला आहे.

अजितनाथ लक्ष्मण गायकवाड (वय २४, रा. तुकाराम मनोहर चोपडे (वय १९), रोहित रामप्रताप वर्मा (वय १९, तिघे रा. महंमदवाडी, हडपसर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांचा साथीदार पवित्र सिंग गब्बरसिंग टाक (वय १९, रा. रामटेकडी) हा फरार झाला आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले की, वाहनचोरीच्या गुन्ह्यांची उकल करण्यासाठी वानवडी पोलिसांचे पथक गस्तीवर होते. त्या वेळी कृष्णानगर येथील स्मशानभूमी परिसरात त्यांना तिघे जण संशयास्पदरीत्या थांबलेले दिसले. पोलिसांना संशय आल्यामुळे त्यांना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता त्यांनी दुचाकी व मोबाईल चोरी केल्याची कबुली दिली. चौघेही रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्यांच्या विरुद्ध शहरातील विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. शहरातील सार्वजिक ठिकाणी किंवा रस्त्याच्या कडेला पार्क केलेल्या दुचाकीवर लक्ष ठेवून बनाट चावीच्या साह्याने हे चौघेही वाहनचोरी करत होते. तर, त्यांनी तब्बल ४५ मोबाईल चोरी केल्याचे पोलिसांच्या तपासातून समोर आले आहे.

वानवडी पोलीस ठाण्यातील ६, हडपसर ३, कोंढवा, लोणी काळभोर, यवत व लोणीकंद पोलीस ठाण्यातील प्रत्येकी एक असे एकूण १३ गुन्हे उघडकीस आले आहेत

लोकमत – दि. १६ डिसेंबर, २०१९

# हडपसर परिसरात विरुद्ध दिशेने वाहने चालविणाऱ्यांवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क



हडपसर परिसरात विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्या चालकांविरोधात पोलिसांनी रविवारी कारवाई केली.

हडपसर : पुणे-सोलापूर रस्त्यावरील वैदूवाडी चौक, मगरपट्टा चौक, गांधी चौक, हडपसर गाडीतळ, रवीदर्शन, आकाशवाणी, मांजरी फाटा येथे विरुद्ध दिशेने येणाऱ्या आणि वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर पोलिसांनी कारवाई केली. तसेच, वाहनांना जॅमर लावले. या वेळी दुचाकी, चारचाकी आणि विनापरवाना वाहनचालकांवर कारवाई करुन दंड वसूल करण्यात आला.

बेशिस्त आणि विरुद्ध बाजूने वाहने चालविण्यामुळे वाहतुकीला अडथळा होत आहे. वाहतूक सुरळीत व्हावी, यासाठी पोलीस आयुक्त के. वेंकटेशम आणि पोलीस उपायुक्त पंकज देशमुख यांच्या सूचनेनुसार विरुद्ध दिशेने आणि बेशिस्त वाहनांवर दंडात्मक कारवाई केली आहे, अशी माहिती हडपसर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक राजेंद्र जाधव यांनी दिली.

पोलीस उपनिरीक्षक अशोक शिंदे, राजाराम फडतरे, अजित नाईक, दिलीप धनवडे, दिनेश टपके, युवराज जाधव, मनोज ठाकरे, बाबासाहेब सातपुते, कल्पना थिटे, आशिष गरुड यांच्या पथकाकडून कारवाई केली गेली.

पुढारी – दि. ३० डिसेंबर, २०१९



# वानवडीतील दारू अड्ड्यावर छापा

पुणे : प्रतिनिधी

वानवडी परिसरातील कंजारभाट वस्तीत गुन्हे शाखा युनिट पाचच्या पथकाने छापा टाकून गावठी दारू तयार करणारे अड्डे उद्ध्वस्त केले. राहत्या घरासह टेरेसवर गावठी दारू तयार केली जात असल्याचे कारवाईदरम्यान समोर आले. यावेळी पोलिसांनी ५८ हजार रुपये किमतीचे १५ हजार लिटर रसायन नष्ट करून दोघांना ताब्यात घेतले आहे. सरवीन कालकर आणि राजेश कालकर (दोघेही रा. संतोषनगर झोपडपट्टी, कंजारभाट वस्ती, वानवडी) अशी ताब्यात घेतल्यांची नावे आहेत.

वानवडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कंजारभाट वस्तीत मोठ्या प्रमाणात गावठी दारू तयार करण्यात येत असल्याची माहिती गुन्हे पथकाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने त्या ठिकाणी छापा टाकून २७० लिटर देशी दारू आणि १५ हजार लिटर रसायन जप्त करून नष्ट केले. ही कारवाई अपर पोलिस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली.

विदेशी बनावटीची ७ लाखांची सिगारेट जप्त वैधानिक इशारा नसलेल्या आणि अवैध पद्धतीने विक्री करण्यात येत असलेली विदेशी बनावटीची सात लाख रुपयांची सिगारेटची पाकिटे गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने जप्त केली आहेत. कोटपा ॲक्टनुसार ही कारवाई गणेश पेठ, पांगुळ आळी या ठिकाणी करण्यात आली. या प्रकरणी दुकान मालक प्रकाश मनोहरलाल जैनानी (वय ३१, रा. आझादनगर, हडपसर) याला ताब्यात घेतले असून पुढील कारवाईसाठी फरासखाना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# चोरीप्रकरणी कुटुंब गजांआड

## गोल्ड लोन शाखेतील दरोडाप्रकरण

म. टा. प्रतिनिधी, येरवडा


चंदननगर येथील इंडिया इन्फोलाइन फायनान्स लिमिटेड (आयआयएफएल) गोल्ड लोन शाखेत दरोडा टाकून सव्वाचार कोटी रुपयांचे दागिने चोरल्याप्रकरणी पोलिसांनी आणखी चार आरोपींना अटक केली आहे. दरोड्यातील सोने लपवून ठेवल्याचे निष्पन्न झाल्याने मुख्य सूत्रधाराची पत्नी, मेव्हणा, सासू आणि सासऱ्याला अटक केली आहे. या प्रकरणी सहा जणांना अटक केली आहे.

सुभाष रामचंद्र राठोड (वय ५७), ज्योती सुभाष राठोड (वय ४८), अजय सुभाष राठोड (वय २८, रा. सर्व रा. बुलडाणा) आणि शीतल दीपक जाधव (वय २६, रा. ज्युवलेशन सोसायटी, आव्हाळवाडी, वाघोली) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याआधी दीपक विलास जाधव (वय ३२, रा. वाघोली) आणि सनी केवल कुमार (वय २९, रा. लोणार गल्ली, पुणे) यांना अटक झाली होती. मनीषा मोहन नायर (वय या प्रकरणी फिर्याद दिली होती. यातील सुभाष राठोड हे बुलडाणा जिल्हा परिषदेमध्ये कृषी अधिकारी म्हणून कार्यरत असून, त्यांना सेवानिवृत्त होण्यास एक वर्ष शिल्लक होते.

'आयआयएफएल' गोल्ड लोनची चंदननगर शाखा आहे. पाच डिसेंबर रोजी सकाळी नेहमीप्रमाणे कार्यालय उघडल्यावर बँकेचे कर्मचारी ग्राहकांनी सोने तारण ठेवलेल्या पाकिटांची मोजणी करीत होते. त्या वेळी एक जण बनावट ग्राहक बनून आत आला. त्याच्यामागे दोघे जण घुसले. चोरट्यांनी पिस्तुलाचा धाक दाखवून बँकेत मोजणी करण्यासाठी काढलेले चारशे ग्राहकांचे सव्वाचार कोटी रुपयांचे दागिने घेऊन पळ काढला होता.

पोलिसांनी 'सीसीटीव्ही'द्वारे आणि तांत्रिक मदतीच्या साह्याने दीपक जाधव याला बुलडाण्यातून आणि सनी कुमार याला औरंगाबादमधून अटक केली होती. तपास चालू असताना जाधव हा दरोडा टाकल्यावर वाघोलीतील घरी गेला होता. तेथे पत्नी शीतल आणि मेव्हणा अजय याच्या मदतीने काही सोने घेऊन तो बुलडाण्यात सासरवाडीला गेला. तेथे सासू ज्योती आणि सासरे सुभाष राठोड यांच्याकडे चोरीचे सोने ठेवले होते. आरोपीची चौकशी केल्यावर चंदननगर पोलिसांनी बुलडाण्यातील त्यांच्या सासरवाडीतून दरोड्यातील सोने जप्त केले. या प्रकरणात सासरच्यांचा सहभाग आढळल्याने पोलिसांनी पत्नी आणि मेव्हण्याला १२ डिसेंबर आणि सासू आणि सासऱ्याला गुरुवारी अटक केली. न्यायालयाने सर्व आरोपींची रवानगी कारागृहात केली आहे. पोलिसांनी आरोपींकडून तीन कोटी रुपयांचे सोने हस्तगत केले आहे.

### तीन कोटींचे दागिने जप्त



### उच्चशिक्षित आरोपी

अटक केलेले आरोपी उच्चशिक्षित असून, सुभाष रामचंद्र राठोड हे हे बुलडाणा जिल्हा परिषदेमध्ये कृषी अधिकारी म्हणून कार्यरत असून, त्यांना सेवानिवृत्त होण्यास एक वर्ष शिल्लक होते. त्यांचा मुलगा अजय राठोड हा पदविधर आहे. तसेच यापूर्वी अटक केलेला मुख्य आरोपी दीपक जाधव हा स्पर्धा परिक्षेचा तयारी करत होता. तसेच त्याची पत्नी शीतल जाधव हीदेखील पदवीधर आहे.

PuneMirror - 12 December, 2019

# Ex-director of IT firm held for data robbery

## Police arrest Yusuf Parkar on complaint filed by his former employer

Anurag.Bende
@timesgroup.com
TWEETS @AnuragMIRROR


A former marketing director of an NIBM Road-based firm, which specialises in dealing with information technology-enabled services (ITES), has been arrested by the cyber police for allegedly stealing data from his company and using it for his personal gain.

Yusuf Parkar, a resident of Kondhwa, was a marketing director of Sales Leaders Solutions Pvt Ltd, a company located near Jyoti Hotel on NIBM Road in Kondhwa, before the company fired him.

Parkar was terminated from the job after his alleged involvement in data theft in July this year came to light. He was arrested under section 408 of Indian Penal Code (IPC) for criminal breach of trust and relevant sections of the Information Technology Act.

Confirming his arrest, senior inspector Jayram Paygude said, "On the basis of the complaint filed by the managing director of the company, we have arrested Parkar. We produced him before the court and on the same day, we have also submitted a chargesheet."

Managing director Ayyaj Ishak Khan had filed a complaint against Parkar with the cyber police station in September, based on which the arrest was made. According to the complaint, Khan, Parkar and another director Rohan Mache were running the business for the firm when the data theft occurred.




MAHENDRA KOLHE

Parkar (inset) was a marketing director of Sales Leaders Solutions Pvt Ltd

Speaking to *Mirror*, Mache said, "As we were directors in the company, we had access to the computer kept in the director's cabin, which had all the important client-related data. We had been working together from last few years but, since last one year, he (Parkar) had started demanding that he wanted 33 per cent share in the company, which the managing director rejected."

According to Mache, after Parkar's share demand was rejected, he started behaving quite differently. Mache said, "We witnessed some change in his behaviour after his demand was rejected. In July, we had some argument with Parkar outside the office, after which he left the spot. Later, on the CCTV camera, we saw him sitting in the director's cabin and operating computers. I immediately informed Khan and rushed to the office."

"I saw that Parkar was sitting on the office computer and he was permanently deleting data important for the company. We immediately accosted him and asked him to go out of the office. The next day, he was terminated. However, during an internal check, we found that he had stolen some data from the office and had transferred it to another account he operated, using which he had started approaching our clients. The moment we got evidence of data theft, we informed the police," Mache added.

# सराईत चोराकडून सात दुचाकी जप्त

## हडपसर पोलिसांची कारवाई

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी) - हॉटेलमध्ये वेटरचे काम करणाऱ्या सराईत दुचाकीचोराला हडपसर पोलिसांनी जेरबंद केले. त्याच्या ताब्यातून चार लाख रुपये किमतीच्या सात दुचाकी जप्त केल्या आहेत.

मुकेश ऊर्फ दादा श्याम शिंदे (वय १९ रा. हडपसर, मूळ शिंगोली, धाराशिव) असे अटक केलेल्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हडपसर पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचारी सासवड रस्त्यावरील गोंधळेनगरला गस्त घालत होते. त्यावेळी शनिमंदिराकडून वेगात आलेल्या दुचाकीस्वाराला पोलिसांनी थांबविण्याचा इशारा केला. मात्र, त्याने दुचाकी न थांबविता पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग करून मुकेशला ताब्यात घेतले. त्याच्याकडील दुचाकीची कागदपत्रे मागितली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. अधिक चौकशीत त्याने चोरीची कबुली दिली. मुकेश धाराशिवमधील सराईत गुन्हेगार असल्याचे निषन्न झाले.

ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त सुनील फुलारी, पोलीस उपायुक्त सुहास बावचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील कलगुटकर, सहायक पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, सहायक पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक हिमालय जोशी, युसूफ पठाण, संपत औचरे, राजेश नवले, सैदोबा भोजराव, विनोद शिवले, नितीन मुंढे, अकबर शेख, शाहिद शेख, शशिकांत नाळे यांच्या पथकाने केली.



कात्रज परिसरातून जप्त केलेले मांडूळ दाखविताना भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी.

# मांडुळांची तस्करी करणारा अटकेत

## भारती विद्यापीठ पोलिसांनी तीन मांडूळ केले जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

धनकवडी : मांडुळांची तस्करी करणाऱ्या एका इसमाला भारती विद्यापीठ पोलिसांनी राजस सोसायटी, कात्रज येथे सापळा रचून अटक केली आहे. तसेच, त्याच्याकडून १२०० ग्रॅम वजनाचे ३ फूट लांबीचे एक, तर ४०० ग्रॅम वजनाचे दोन अशी तीन मांडुळे जप्त केली आहेत. मांडुळांची किंमत अंदाजे दहा लाख रुपये आहे.

उस्मान सय्यद नजीर सय्यद (वय ३६, रा. साळुंखे विहार रोड, कोंढवा) असे अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक महेंद्र पाटील आपल्या कर्मचाऱ्यांसह पेट्रोलिंग करत होते. त्या वेळी पोलीस कर्मचारी उज्ज्वल मोकाशी व शिवदत्त गायकवाड यांना कात्रज परिसरात एक इसम मांडूळ विकण्यासाठी येणार असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यांनी याची माहिती पोलीस उपनिरीक्षक महेंद्र पाटील यांना कळविली.

ही कामगिरी पोलीस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस उपायुक्त सर्जेराव बाबर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे, उपनिरीक्षक महेंद्र पाटील, हवालदार विनोद भंडलकर, श्रीधर पाटील, गणेश सुतार, उज्ज्वल मोकाशी, प्रणव सकपाळ, समीर बागसिराज, हर्षल शिंदे, शिवदत्त गायकवाड, जगदीश खेडकर यांच्या पथकाने केली.

- भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांच्या आदेशानुसार उपनिरीक्षक पाटील यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी सणस यांच्याशी संपर्क साधून अधिकारी उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली. त्यानुसार वनरक्षक एस. एस. बुचडे यांच्यासह पोलिसांनी कात्रज चौक येथे छापा टाकून आरोपीला अटक केली. चौकशी करण्यात आली असता त्याने ही मांडुळे विक्रीसाठी आणली असल्याचे सांगितले.

# शहरात गुन्हे शाखेकडून झाडाझडती

## मर्यादेपेक्षा जास्त वेळ सुरू असलेल्या हॉटेल्ससह पबवर कारवाई

**पुणे : प्रतिनिधी**

गुन्हेगारांसह सराईत गुन्हेगारांसाठी विशेष मोहीम राबवून गुन्हे शाखेने झाडाझडती घेण्याबरोबरच शहरात मर्यादेपेक्षा अधिक वेळ सुरू असणाऱ्या हॉटेल्स अन् पबवर कारवाईचा बडगा उचलला आहे. मर्यादेपेक्षा अधिक वेळ सुरू असणाऱ्या पंचतारांकित हॉटेल्ससह पबवर कारवाई करत त्यांच्यावर खटले दाखल करण्यात आले आहे. या कारवाईत १ लाख ८ हजाराचा दंड वसूल करण्यात आला आहे.

शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी गुन्हे शाखेकडून अधूनमधून अचानक विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच, पाहिजे आरोपी तसेच सराईत गुन्हेगारांची चेकिंग केली जात आहे. तर, उशिरापर्यंत सुरू असणाऱ्या हॉटेल्सवरही कारवाई करण्यात येत आहे. ५० हून अधिक हॉटेल्स आणि पब पाहिल्यानंतर त्यातील २७ आस्थापनांवर कारवाई करत खटले दाखल केले आहेत, तर ३१ गुन्हेगारांना अटक करण्यात आली. गुन्हे शाखेचे अप्पर पोलिस आयुक्त अशोक मोराळे व उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी दोन दिवस रात्री (दि. २८ व २९) अचानक विशेष मोहिमेद्वारे शहरातील हॉटेल्स आणि गुन्हेगारांची झाडाझडती घेतली.

**कारवाईत १ लाख ८ हजारांचा दंड वसूल**

### कारवाईत मुद्देमाल ताब्यात


टोळीतील ३९ जणांना तपासल्यानंतर त्यातील २० जण मिळून आले आहेत. अमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी ४ जणांची चौकशी केल्यानंतर चारही जण मिळून आले आहेत. दारू पिऊन वाहन चालविण्याचे दोन खटले भरविण्यात आले आहे. सराईत गुन्हेगारांची तपासणी केली असता, त्यातील ३१ जण मिळून आले आहेत. तडीपार असलेले २३ आरोपी चेक केल्यानंतर त्यातील एकही जण शहरात मिळून आला नाही. एका जुगार अड्ड्यावर छापा टाकून १७ जणांना ताब्यात घेण्यात आले. विनापरवाना विदेशी दारू विकणाऱ्या एका हॉटेलवर कारवाई करण्यात आली आहे.

# Koregaon Park traffic division records highest drink driving cases in 2019

**YEAR-ENDER ALARM** KP registered 1,004 cases, while the least number of cases, 168, has been recorded at Sinhgad

## YOU BOOZE, YOU CRUISE, YOU LOSE

A total of 13,228 cases have been recorded between January 1, 2019 and December 22, 2019




**1,004**
Highest number of cases registered at Koregaon Park between January 1, 2019 and December 22, 2019

**168**
Least number of cases registered at Sinhgad between January 1, 2019 and December 22, 2019

**24**
Total number of traffic divisions under the Pune district commissionerate

**2,702**
Highest number of cases registered across all divisions in April



■ The traffic police use breath analysers to check for offenders.

### WHAT THE LAW SAYS

New penalty amounts under Motor Vehicles Amendment Act, 2019 from Sept 1, 2019

- First time drink driving offence– up to ₹10,000 fine or six months jail
- Second time drink driving offence up to ₹15,000 fine or two years jail
- Alcohol limit is fixed at 0.03% in 100 ml blood

> The stringent action has had an impact on offenders as they now know, that they have to visit the court for proceedings if caught drinking and driving.

PANKAJ DESHMUKH, DCP Zone IV

## Resto-bars to stay open till 5 am on Christmas and New Year's Eve

RESTAURANTS, BARS TO BE OPEN TILL 5 AM, WHILE WINE SHOPS IN CITY CAN OPERATE TILL 1AM IN ORDER TO SERVE ALCOHOL TO PATRONS

# बेकायदा हुक्का पार्लरवर कारवाई

## पोलिसांचा छापा : ३१ तरुण-तरुणी जाळ्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : नववर्षाच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांचे सेवन केले जात असते. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी गुन्हे शाखेने तपासणी सुरु केली आहे. त्यात कोंढव्यात बेकायदा हुक्का पार्लर सुरु असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्यावर छापा घातला असता तेथे ३१ तरुण तरुणी हुक्का सेवन करताना आढळून आले.

पोलीस निरीक्षक विजय टिकोळे व त्यांच्या पथकाने कोंढव्यातील महंमदवाडी येथील बेहस्ता हॉटेलवर कारवाई केली. या हॉटेलमध्ये ३१ तरुण-तरुणी हुक्का सेवन करताना आढळून आले.

हॉटेलचा मॅनेजर झाहीदअली सज्जादअली शेख (रा. गुरुवार पेठ) व त्याचा कामगार जमीर महेबूब शेख (रा. ताडीवाला रोड) हा या तरुण-तरुणींना हुक्का पुरविताना आढळून आले. हॉटेलमधून तंबाखूजन्य हुक्का फ्लेवर, हुक्का पॉट असा ७३ हजार ५०० रुपयांचा माल जप्त





करण्यात आला आहे. मॅनेजर व कामगारांवर कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच हुक्का सेवन करणाऱ्या ३१ तरुण-तरुणींवर कोटपा ॲक्टनुसार कारवाई करण्यात आली आहे.

# तडीपार सराइताकडून दोन गावठी कट्टे जप्त

**पुणे :** सराईत गुन्हेगारावर तडीपारीची कारवाई केल्यानंतरदेखील शहरात देशी बनावटीचा गावठी कट्टा घेऊन फिरणाऱ्याला वानवडी पोलिसांनी अटक केली. संतोष नाथू (४३, रा. झांबरे पॅलेसजवळ, महर्षिनगर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरोधात वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी त्याच्या ताब्यातून दोन गावठी कट्टे आणि तीन जिवंत काडतुसे असा ४० हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

वानवडी पोलिसांचे एक पथक गुरूवारी रात्री हद्दीत गस्तीवर असताना लुल्लानगर चौक ते गोळीबार मैदान या दरम्यान एक व्यक्ती गावठी कट्टे घेऊन फिरत असल्याची माहिती पथकातील कर्मचाऱ्यांना मिळाली होती. त्यानुसार सहायक फौजदार प्रदिप गुरव, कर्मचारी दत्तात्रय तेलंगे, ज्ञानदेव गिरमकर, शिरीष गोसावी, गणेश खरात, सुदर्शन बोरावके, युवराज दुधाळ यांच्या पथकाने रात्री पावणेनऊच्या सुमारास संतोष नाथू याला ताब्यात घेतले.



TIMES OF INDIA - 25 December, 2019

# Two minors detained for torching nine vehicles

Times News Network

**Pune:** The Pune crime branch on Tuesday detained two minors for Sunday's incident, in which nine two-wheelers were set ablaze in Mhatobanagar in Kothrud.

Early on Sunday morning, residents of Mhatobanagar Lane No. 3 were woken up by the loud bang of the petrol tank of a motorcycle exploding. The fire spread to eight other two wheelers. Five vehicles were completely gutted, while four were partially damaged.

Sanket Ubhe of Mhatobanagar, whose motorcycle tank had exploded, lodged an FIR with the Kothrud police.

The two minors — both from Kothrud — were detained after crime branch assistant inspector Dattatreya Garud received a tip-off that they were involved in the incident.

The investigation revealed that the arson was an act of revenge — they had an altercation with the son of a man who owned one of the damaged motorcycles.


## 5 two-wheelers gutted as motorcycle tank explodes

Cops Suspect Arson; Vehicle Thief Caught On CCTV Cam

MORNING MAYHEM

TOI REPORT ON DEC 23, 2019

Senior inspector of crime branch (unit-III) Rajendra Mokashi detained the two boys and handed them over to the Kothrud police for further probe.

"During questioning, the duo admitted to torching the vehicles," Garud said.

He said the two boys said they had quarrelled with a boy a month ago. The boy was riding his father's two-wheeler at the time. "Enraged, the two boys decided to set the boy's father's motorcycle on fire," Garud said.

Initially, the police had suspected the involvement of a man, who was caught on a CCTV camera trying to steal a brand new motorcycle from Lane No. 2 of Mhatobanagar. "Our investigation revealed that the person had no connection with this incident. We are investigating that incident separately," an officer from the Kothrud police said.

# Police book two for kidnap and murder of 42-year-old woman

HT Correspondent
puneletters@htlive.com

**PUNE:** Pune police registered a case against two unidentified men on Saturday for the kidnap and murder of a 42-year-old woman.

The incident took place on November 25 at 10pm. According to the police, the two men were seen entering an autorickshaw with the victim from Dhayari chowk.

They are suspected to have kidnapped and killed her before allegedly stuffing her body in a drainage chamber in Warje, 6-7km from Dhayari chowk.

"The body was found on November 30. We are currently on a lookout for the two men.

**THE ACCUSED ARE SUSPECTED TO HAVE KIDNAPPED AND KILLED HER BEFORE ALLEGEDLY STUFFING HER BODY IN A DRAINAGE CHAMBER IN WARJE, 6-7KM FROM DHAYARI CHOWK**

The investigation is still ongoing and we will be arresting the accused soon," said Ashok Kadam, senior police inspector, Warje Malwadi police station.

The body was found after the residents of the area near the Mhada canal, where the chamber is located, complained of a foul smell emanating from the area.

The woman's 52-year-old husband had filed a missing person complaint at Sinhagad road police station.

While the body was taken for post-mortem at Sassoon General Hospital, the police tried to ascertain the identity of the victim through her belongings.

The husband identified the belongings and subsequently a case of murder was registered on Saturday.

A case under Sections 363 (kidnapping), 302 (murder), 201 (destruction of evidence) and 34 (common intention) of Indian Penal Code has been registered at Warje police station against the two men.

# रोडरोमिओला पोलिसांचा हिसका

पुणे, ता. ११ : अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिच्याशी बोलण्याचा आणि जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत छेड काढणाऱ्या रोडरोमिओला पोलिसांनी अटक केली. हडपसर परिसरात हा प्रकार घडला.



आकाश विजयकुमार पाटकर (वय १९, रा. वडकी नाला, ता. हवेली) असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. संबंधित मुलीच्या आईने एक मुलगा माझ्या मुलीचा सतत पाठलाग करून तिला त्रास देत असल्याबाबत तक्रार दाखल केली होती. त्यानुसार हडपसर पोलिसांनी मुलाचे नाव, पत्ता माहिती नसतानाही त्या रोडरोमिओचा शोध घेऊन त्याला अटक केली. त्याच्याविरोधात हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आकाश हा वडकी नाला येथे राहावयास आहे. संबंधित मुलगी रस्त्यावरून जाताना दिसली, की तो तिचा पाठलाग करायचा. तसेच, बळजबरीने तिच्याबरोबर बोलण्याचा प्रयत्न करीत होता. त्याचा हा प्रकार मागील चार महिन्यांपासून सुरू होता. मुलीशी आकाशची ओळख नव्हती तसेच त्याचे नाव आणि पत्ताही माहीत नव्हता. दरम्यान, सततच्या त्रासाला कंटाळलेल्या मुलीने याबाबत कुटुंबीयांना माहिती दिली. मुलीच्या आईने हडपसर पोलिसात धाव घेत त्रास देणाऱ्या अज्ञात तरुणाविरोधात तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला तसेच तपास सुरू केला.

सहायक निरीक्षक संजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कर्मचारी युसूफ पठाण, विनोद शिवले, अमित कांबळे, अक्बर शेख, शशिकांत नाळे, ज्ञानेश्वर चित्ते आदींच्या पथकाने मुलगी राहत असलेल्या भागात सापळा रचून आरोपीस अटक केली.

# 13,000 offenders booked for drink driving in 2019

**COP WATCH** Challans were issued in Kalyaninagar, Hinjewadi & Koregaon Park

HT Correspondent

**PUNE:** During 2019, the traffic branch of Pune police took action against nearly 13,000 "drink driving" offenders as against 7,310 offenders in 2018.

The Pune police claimed that this was among the reasons for reduced number of road accidents and deaths since 2018.

While 204 accidents occurred in 2018 leading to 215 deaths on the city roads during 2018, in the current year, the number reduced to 153 accidents and 151 deaths.

Senior traffic police officials said, on an average, between 35-40 drivers were caught driving under the influence of alcohol daily by police teams deployed randomly around the city during night hours.

According to statistics compiled by the traffic police, the highest number of challans were issued by police teams deployed in areas close to highways at Hinjewadi, Katraj, Hadapsar, Yerawada, Koregaon Park, Baner and Kalyaninagar.

Pankaj Deshmukh, deputy commissioner of police (traffic), said, "We catch offenders at randomly selected spots around the city and our divisional teams are deployed every day, including on weekdays. Interestingly, more offenders on any given day are those driving four wheelers. All this is being done as part of concerted efforts to make the city roads safer for the citizens," he said.


**PUNE POLICE CLAIMED** THAT INCREASED ACTION AGAINST DRINK DRIVING WAS ONE OF THE REASONS FOR REDUCED NO. OF ACCIDENTS SINCE 2018



According to Pankaj Deshmukh, DCP (traffic), divisional teams are deployed every day at random spots across the city to carry out nakabandi (image for representational purpose only). HT FILE PHOTO

## CRACKING THE WHIP ON REVELLERS

On an average, 35-40 drivers are caught driving under the influence of alcohol daily



# घरफोडी करणारे दोघे सराईत अटकेत

**पुणे : प्रतिनिधी**

ऐन दिवाळीमध्ये घरफोडी करणाऱ्या दोन सराइतांना गुन्हे शाखा परिमंडळ ३ च्या पथकाने अटक केली आहे. राजू चंदू राठोड (३८, राडी, हडपसर) आणि दिनेश मनिलाल सोलंकी (३०, रा. अंधेरी पूर्व, मुंबई) अशी अटक करण्यात आलेल्या दोन सराइतांची नावे आहेत.

याबाबत गणपत चंद्रहास गोडसे (रा. नीता बिल्डिंग, कोंढवे-धावडे) यांनी उत्तमनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. गोडसे हे कामानिमित्ताने बाहेर गेले असताना दिवसा झालेल्या घरफोडीत त्यांच्या घरातील सोन्या-चांदीचा ऐवज चोरून नेला होता. गुन्ह्याचा तपास करत असताना सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी निष्पन्न झाले. त्यानुसार परिमंडळ ३ चे अधिकारी आणि कर्मचारी यांनी हडपसर येथून राठोड आणि सोलंकी या दोघांना अटक केली. दागिने विकून आलेली काही रक्कम दोघांकडून जप्त करण्यात आली आहे. राठोडच्या विरोधात शहरात चार घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत, तर सोलंकी याच्याविरुद्ध मुलुंड पोलिस ठाण्यातील घरफोडीच्या गुन्ह्यात त्याला शिक्षा झाली आहे. दोघांना न्यायालयाने दोघांनाही २ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

गुन्हे शाखा परिमंडळ ३ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र मोकाशी, सहायक पोलिस निरीक्षक भालचंद्र ढवळे, उपनिरीक्षक किरण अडागळे, संजय गायकवाड, सहायक पोलिस उपनिरीक्षक किशोर शिंदे, संतोष क्षीरसागर, अतुल साठे, मेहबूब मोकाशी, संदीप राठोड, दत्तात्रय गरुड, राहुल घाडगे, मच्छिंद्र वाळके, गजानन गाणबोटे, सुजित पवार यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

**लोकमत** – दि. २० डिसेंबर, २०१९

# कोयत्याने वार केल्याप्रकरणी तिघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पूर्ववैमनस्यातून एकावर कोयत्याने वार करून जखमी केल्याप्रकरणी उत्तमनगर पोलिसांनी तिघांना अटक केली. न्यायालयाने त्यांना दोन दिवस पोलीस कोठडीमध्ये ठेवण्याचा आदेश दिला आहे.

चेतन लक्ष्मण चव्हाण (वय १९), गणेश वाघमारे (वय १९), प्रसन्न ऊर्फ बाळा मनोज कदम (वय २०, तिघेही रा. शिवणे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी आणखी एकावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत तुषार विठ्ठल सणस (वय २४) यांनी फिर्याद दिली आहे.

२५ नोव्हेंबर रोजी शिवणे परिसरातील महादेव मंदिराजवळ ही घटना घडली. सणस हे महादेव मंदिराच्या परिसरात त्यांच्या मित्राबरोबर गप्पा मारत थांबले होते. त्यावेळी जुन्या भांडणाच्या रागातून बाळा कदम, चेतन चव्हाण, वाघमारे आणि त्यांच्या साथीदाराने सणस यांना शिवीगाळ केली. त्यानंतर सणस यांच्या उजव्या हातावर कोयत्याने वार केला. सणस यांना खाली पाडून मारहाण केली.

तसेच परिसरातील दुचाकींचे नुकसान करत नागरिकांना धमकी देत दहशत पसरविली, असे फिर्यादीत नमूद केले आहे. याप्रकरणी तिघांना न्यायालयात हजर केले असता, गुन्ह्यातील हत्यारे जप्त करण्यासाठी, त्यांच्या साथीदाराचा शोध घेण्यासाठी, त्यांचा आणखी कोणी साथीदार आहे का? याचा तपास करण्यासाठी त्यांना पोलीस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकील सुरेखा क्षीरसागर यांनी केली.

**पुढारी** – दि. १८ डिसेंबर, २०१९

# दुचाकी चोरटा जेरबंद

**पुणे :** शहरातील टिळक स्मारकाजवळील पोस्ट ऑफिससमोरील रस्त्यावरून दुचाकी चोरी करणाऱ्या अक्षय भुजंग नायडू (२५, रा. मंगळवार पेठ) याला विश्रामबाग पोलिसांनी अटक केले आहे. या वेळी त्याच्या ताब्यातून २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी पराग पोपटराव राऊत (४४, रा. सिंहगड रस्ता) यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

राऊत यांनी ७ सप्टेंबरला टिळक स्मारकाजवळील पोस्ट कार्यालयाजवळ दुचाकी उभी केली होती. त्यानंतर ते मित्रासोबत चहा पिण्यासाठी हॉटेलमध्ये गेले होते. दरम्यान याच संधीचा फायदा घेत चोरट्याने त्यांची दुचाकी चोरून नेली होती. तीन दिवसांपूर्वी विश्रामबाग पोलिस परिसरात गस्त घालत असताना दुचाकीवर एक जण संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आला. त्यानुसार पोलिसांनी अक्षयला ताब्यात घेऊन दुचाकीच्या कागदपत्रांची विचारणा केली. त्या वेळी त्याने टिळक स्मारक परिसरातून दुचाकी चोरल्याची कबुली दिली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. ७ डिसेंबर, २०१९

# खून करून पुण्यात आलेला अटकेत

**गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाची कामगिरी**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

आंध्र प्रदेशात चिकन सेंटर दुकानदाराचा खून करून पुण्यात पळून आलेल्या उत्तर प्रदेशातील गुन्हेगाराला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाने ही कामगिरी केली.



पोलिस कर्मचारी सचिन जाधव, तुषार माळवदकर यांना तीन दिवसांपूर्वी बातमीदारांमार्फत माहिती मिळाली होती, की आंध्र प्रदेश कडप्पा दोन पोलिस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या खुनातील आरोपी खडकी येथील नातेवाइकांकडे राहण्यासाठी आला आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा मारून एका व्यक्तीला ताब्यात घेतले. पोलिसांनी चौकशी केली असता, अमीर मुखीमुद्दीन अली (२०, रा. शहापूर, जि. प्रतापगड, उत्तर प्रदेश) असे त्याचे नाव असल्याचे त्याने सांगितले. तसेच, तो सध्या कडाप्पा येथे राहत असल्याचेही त्याने सांगितले. त्याच्याकडे अधिक विचारणा केली असता, चुलते आणि एक भाऊ यांच्या मदतीने चिकन सेंटरचा मालक इम्तियाज शेख याचा तीन दिवसांपूर्वी खून करून येथे नातेवाइकांकडे लपून राहण्यासाठी आलो असल्याची कबुली त्याने दिली.

खून झालेला चिकन सेंटरचा मालक हा लहान-लहान कारणांवरून बोलून अलीचा अपमान करीत होता. या गोष्टीचा राग डोक्यात ठेवून, खून केल्याचे आरोपी अली याने सांगितले. अलीला ताब्यात घेऊन कडप्पा पोलिस स्टेशनच्या ताब्यात दिले जाणार आहे.

युनिट एकचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरुण वायकर, पोलिस उपनिरीक्षक उत्तम बुदगुडे, इम्रान शेख, गजानन सोनुने, सुधाकर माने, योगेश जगताप, सुभाष पिंगळे, उमेश काटे, तुषार खडके, विजेसिंग वसावे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १६ डिसेंबर, २०१९

# मोबाइल चोरणारे तीन जण अटकेत

पुणे : कोंढवा परिसरात पायी घरी निघालेल्या तरुणाला अडवून जबरदस्तीने मोबाइल हिसकाविणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून चोरीचा मोबाइल आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

अनुराग बाळासाहेब दणाणे (वय १९, रा. कोंढवा), उमेश ज्ञानेश्वर गोंडे (वय २३, रा. बारामती), अक्षय हरिभाऊ वाकुडे (वय २०, रा. कोंढवा) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी रामनियावर यादव (वय १९, रा. लेबर कॅम्प, विमाननगर) यांनी तक्रार दिली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे शनिवारी रात्री कामावरून घरी पायी जात होते. त्या वेळी दुचाकीवरून 'ट्रीपल सीट' आलेल्या आरोपींनी त्याला अडविले. यानंतर त्याच्याकडून सात हजार २०० रुपये किमतीचा मोबाइल जबरदस्तीने हिसकावून पळ काढला. या प्रकरणी त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली होती. त्यानुसार आरोपींच्या वर्णन व इतर माहितीच्या आधारे तिघांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी सहायक पोलिस निरीक्षक चेतन मोरे तपास करत आहेत.

**पुढारी – दि. ०१ डिसेंबर, २०१९**

# पिस्तूल बाळगले; एकास अटक

**पुणे : प्रतिनिधी**

सशस्त्र हल्ला केल्याचा बदला घेण्यासाठी देशी बनावटीचे पिस्तूल आणि चार काडतुसे बाळगल्याप्रकरणी फ्रँकी ऊर्फ छोटू रॉबर्ट स्वामी (वय २२, रा. संत गाडगे महाराज शाळेजवळ, कोंढवा खुर्द) यास वानवडी पोलिसांनी अटक केली. वानवडी परिसरातील केदारीनगर भागातील स्टेफिन हॉटेलजवळ एक युवक पिस्तूलसह उभा आहे अशी माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून त्यास ताब्यात घेतले.

अंगझडतीवेळी त्याच्याकडे देशी बनावटीचे एक पिस्तूल आणि चार जिवंत काडतुसे आढळून आली. फ्रँकी ऊर्फ छोटू स्वामी याने हे पिस्तूल महेश ऊर्फ महेश घोणे (रा. शिवाजी पुतळ्याजवळ, ता. दौंड) याच्याकडून मिळविले असल्याचे सांगितले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील, पोलिस निरीक्षक सलीम चाउस, सहायक फौजदार प्रदीप गुरव, कर्मचारी दत्तात्रय तेलंगे, ज्ञानदेव गिरमकर, शिरीष गोसावी, सुदर्शन बोरावके, युवराज दुधाळ यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**TIMES OF INDIA - 13 December, 2019**

# Agri-extension officer, son in cop net for conspiracy

**Asseem.Shaikh**
@timesgroup.com

**Pune:** A serving agriculture extension officer and his son from Buldhana were arrested on Thursday on the charges of criminal conspiracy and attempt to dispose off robbed gold in the Rs 4.2-crore heist at the India Infoline Finance Limited (IIFL) office in Chandannagar on December 5.

The officer, Subhash Ramchandra Rathod (57), is the father-in-law of MPSC aspirant Deepak Jadhav, the main suspect who was arrested with an accomplice on December 7. Rathod's son, Ajay, is also an MPSC aspirant, the Chandannagar police said.

Four people have been arrested in the case so far.

Senior inspector Shankar Khatke of the Chandannagar police told TOI, "Rathod and his son's involvement in the case came to the fore during Jadhav's interrogation. A police team took the Rathods into custody from Buldhana and brought them to Pune after their involvement in the conspiracy was confirmed."

They will be produced before a magisterial court on Friday for custodial remand.

On the motive behind the robbery, Khatke said, "Jadhav's questioning had revealed that he owed money to various persons. Jadhav and others then robbed 394 packets of gold ornaments worth Rs 4.2 crore from the IIFL by threatening the employees with arms."

**CHANDANNAGAR ARMED ROBBERY**

The police had earlier seized two airguns from Jadhav, which were used in the robbery and later concealed at a vacant plot in Wagholi. "We have seized 8.6kg of gold worth Rs 3 crore from the suspects. We hope to recover more gold from the Rathods during their custodial interrogation. We have fanned out teams for arresting the fifth suspect after his name cropped up during the interrogation of Jadhav and his accomplice," the officer added.

पुढारी – दि. ०७ डिसेंबर, २०१९

# मांजरीतील तिघांना मारहाणप्रकरणी अटक

पुणे : प्रतिनिधी

पुर्व वैमनस्यातून मारहाण करणाऱ्या तिघांना हडपसर पोलिसांनी अटक केली आहे. ओंकार संदेश कावरे (१९, रा. गोपाळपट्टी, धारवाडकर कॉलनी, मांजरी बुद्रुक), दिनेश धनंजय राखपसरे (१९)आणि आकाश दादासाहेब भापकर (२१, रा. घुले वस्ती, मांजरी बुद्रुक) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

याबाबत संगीता संजय आदमाने (४५, रा. घुले वस्ती, मांजरी बुद्रुक रोड) यांनी फिर्याद दिली आहे. संगीता आदमाने यांचा मुलगा अमित याचे पानसे यांच्याशी भांडण झाले होते. त्याच भांडणाचा राग मनात धरून आकाश भापकर व त्याचे साथीदार जबरदस्तीने फिर्यादींच्या घरात घुसले. त्यांनी फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी देवून शिवीगाळ केली; तसेच हाताने मारहाण करून निघून गेले.

अप्पर पोलिस आयुक्त सुनील फुलारी, पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहाय्यक पोलिस आयुक्त सुनील कलगुटकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलिस निरीक्षक (गुन्हे) हमराज कुंभार, सहायक पोलिस निरीक्षक संजय चव्हाण, सहायक पोलिस फौजदार युसुफ पठाण, पोलिस नाईक विनोद शिवले, पोलिस शिपाई अमित कांबळे, अकबर शेख, शशिकांत नाळे, ज्ञानेश्वर चित्ते यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

TIMES OF INDIA - 21 December, 2019

# Teen held, 4 two-wheelers recovered

Times News Network

Pune: A 19-year-old youth was arrested on Friday and four stolen two-wheelers worth Rs1 lakh were recovered from him.

The youth, Yash Sandip Sancheti, lives near Dandekar bridge in the Sinhagad Road area. He stole the vehicles for joyrides. A Shivajinagar police team, led by sub-inspector Subrao Lad, took him into custody during a vehicle checking drive at Shivajinagar.

Lad said Sancheti abandoned the scooter and started running after seeing the police checking vehicles near Dalvi hospital. "We intercepted him after a chase. We found that the registration number on his scooter was fake. He admitted of stealing the scooter later," Lad said.

He said probe revealed that Sancheti had stolen two-wheelers from Shivajinagar, Dattawadi, Bund Garden and Chatushrungi areas. "He used to steal the two-wheelers using duplicate keys. In Shivajinagar, the scooter owner had forgotten keys near the boot," Lad said.

He said Sancheti used to drive a stolen two-wheeler out of the city and abandon it before stealing another.

# तरुणाच्या खुनातील सहा आरोपी अटकेत

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

जमिनीच्या वादातून तरुणाचा दगडाने ठेचून खून करून पसार झालेल्या तीन आरोपींना विश्रांतवाडी पोलिसांनी बुधवारी पहाटे लोणावळ्यातून अटक केली. यापूर्वी या प्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यामुळे तरुणाच्या खुनातील सर्व सहा आरोपींना अटक झाली आहे. कोर्टाने या आरोपींना १७ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

नकुल उर्फ ऋषिकेश हनुमंत झेंडे (वय २०), सुमित सुनील आयगुळे (वय २०) आणि ओंकार राजेंद्र चव्हाण (वय २०, रा. सर्व्हे नं. ११०/१११, शांतीनगर, येरवडा) अशी लोणावळ्यातून अटक केलेल्या तीन आरोपींची नावे आहेत. आनंद उर्फ स्नेहजीत नामदेव पंचमुख (वय ३२), धनंजय किसन लोंढे (वय २३) आणि ऋत्विक साहेबराव निकम (वय २०, सर्व रा. शांतीनगर) या तिघांना विश्रांतवाडी पोलिसांनी मंगळवारीच अटक केली होती. या प्रकरणी एकूण सहा आरोपींना अटक केली आहे.

## कोर्टाने सुनावली सहा दिवसांची पोलिस कोठडी

विवेक बाळासाहेब पंचमुख (वय २९, रा. आशीर्वाद बंगला, जनार्दननगर, लोहगाव) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी विवेकचा भाऊ सुमित पंचमुख (वय २५) याने फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी आनंद पंचमुख आणि त्याच्या साथीदारांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

विश्रांतवाडी येथील जुना आळंदी रस्त्यावर रविवारी रात्री खुनाची घटना घडली होती. मृतदेहाची ओळख पटल्यावर सहा आरोपींची नावे निष्पन्न झाली होती. वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक (गुन्हे) रवींद्र कदम, सहायक निरीक्षक रणजीत मोहिते यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# एस्कॉर्टसाठी तरुणी पुरविणाऱ्यास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : वेश्यागमनासाठी तरुणी पुरविण्याचे काम करणाऱ्या मुख्य सूत्रधाराला येरवडा पोलिसांनी एका तरुणीसह अटक केली आहे.

हेमंत प्राणाबंधू शाहू (वय २८, रा. केसनंद फाटा, मूळ ओरिसा) असे या मुख्य सूत्रधाराचे नाव आहे. त्याचा साथीदार छोटू ऊर्फ राजू शाहू पळून गेला. याबाबत पोलिसांनी सांगितले की, येरवडा पोलीस ठाण्याचे सहायक फौजदार बाळासाहेब बहिरट व त्यांचे साथीदार गस्त घालत असताना ग्राहकांना मागणीप्रमाणे वेश्यागमनासाठी तरुणी पुरविणारा नगर रोडवरील हयात चौकात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शुक्रवारी पहाटे हयात चौकात सापळा लावला. तेव्हा चौकातील टायर दुकानाजवळ एक कार येऊन थांबली. गाडीत दोन पुरुष व एक तरुणी होती. पोलिसांनी दोघांना पकडले. त्या वेळी राजू शाहू पळून गेला. पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केल्यावर हेमंत शाहू हा तरुणींना जादा पैशाचे आमिष दाखवून त्यांना वेश्याव्यवसायासाठी तयार करीत असत. ग्राहकांना त्यांचे फोटो पाठवून त्यांच्या पसंतीप्रमाणे तो तरुणींना लॉजवर स्वत: घेऊन जात असे.

सकाळ – दि. ८ डिसेंबर, २०१९

# येरवड्यात दीड महिन्यात ७८ हातभट्ट्यांवर कारवाई

येरवडा, ता. ७ : गेल्या दीड महिन्यांत पांडुलमाण वस्ती, नाईकनगर, कंजारभाटनगर येथे सुरू असलेल्या ७८ हातभट्ट्यांवर येरवडा पोलिसांनी कारवाई केली. मात्र हे अवैध धंदे पुन्हा सुरू झाले आहेत. हातभट्टी गाळणाऱ्यांमध्ये विशेषतः महिलांचे प्रमाण अधिक आहे. या गुन्ह्यात महिलांना तत्काळ जामीन मिळतो. त्यामुळे महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत कारवाई करण्याचा विचार असल्याची माहिती येरवडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक युनूस शेख यांनी दिली.

येरवड्यातील काही वस्त्यांमध्ये आजही परंपरागत हातभट्ट्या लावून गावठी दारू गाळतात. यामध्ये पांडू लमाण वस्ती, नाईकनगरमध्ये दारू गाळून कंजारभाटनगर, कामराजनगर परिसरात ती विकली जाते. स्थानिक पोलिस, उत्पादन शुल्क विभागाकडून गेल्या दीड महिन्यात परिसरातील ७८ हातभट्ट्यांवर कारवाई करण्यात आली. मात्र त्यानंतर काही दिवसांनी हे अवैध धंदे पुन्हा सुरू झाले आहेत.

मुंबई दारूबंदी अधिनियमाचा वापर करून हातभट्टी गाळणाऱ्यांवर मोठ्या दंडात्मक कारवाई करण्याचा प्रस्ताव आहे. यासह दोनपेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्यांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा विचार आहे. त्यातून या धंद्यांना प्रतिबंध बसविता येईल, असे शेख यांनी सांगितले.

## सिमेंट काँक्रीटखाली रसायनाचा साठा

पांडू लमाण वस्तीमधील अंतर्गत सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याखाली मोठी टाकी तयार करून त्यात हातभट्टीसाठी आवश्यक रसायन व पाण्याचा साठा करून ठेवण्यात आला आहे. यामध्ये महापालिकेतील ठेकेदाराची मदत असण्याची शक्यताही युनूस शेख यांनी वर्तविली आहे.

लोकसत्ता – दि. २४ डिसेंबर, २०१९

# हेल्मेट परिधान न करणाऱ्या दुचाकीस्वारांना ८१ कोटींचा दंड

## वर्षभरात १६ लाख दुचाकीस्वारांवर कारवाई

प्रतिनिधी, पुणे

हेल्मेट परिधान न करणाऱ्या दुचाकीस्वारांविरोधात वाहतूक पोलिसांनी गेल्या वर्षभरात कारवाई तीव्र केली. गेल्या वर्षभरात शहरातील १६ लाख दुचाकीस्वारांवर कारवाई करण्यात आली असून त्यांना ८१ कोटींचा दंड करण्यात आला आहे. वाहतूक पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेरे तसेच प्रत्यक्ष चौकात थांबून ही कारवाई केली.

हेल्मेट परिधान न करणाऱ्या वाहनचालकांना ८१ कोटींचा दंड करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात थकबाकीचे प्रमाण मोठे आहे. आतापर्यंत २१ कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. कारवाईचा संदेश दुचाकीस्वारांना पाठविण्यात आला असून अद्याप अनेकांनी दंडाची रक्कम जमा केली नाही. सर्वोच्च न्यायालयाने हेल्मेट परिधान करणे बंधनकारक केल्यानंतर १ जानेवारी २०१९ पासून हेल्मेट परिधान न करणाऱ्या दुचाकीस्वारांविरोधात कारवाई तीव्र करण्यात आली. हेल्मेट बंधनकारक केल्यानंतर चौकाचौकात थांबून पोलिसांनी दंड वसूल केला.

वाहतूक पोलिसांनी चौकात थांबून कारवाई तीव्र केल्यानंतर हेल्मेट विरोधी कृती (पान २ वर)

### हेल्मेट कारवाई

- जानेवारी ते नोव्हेंबर- १६ लाख २० हजार दुचाकीस्वार
- ठोठाविण्यात आलेला दंड- ८१ कोटी ८९ लाख रुपये
- वसूल करण्यात आलेली रक्कम- २१ कोटी रुपये
- थकीत दंडाची रक्कम- ६० कोटी ८९ लाख रुपये

“ हेल्मेट परिधान न करणाऱ्या दुचाकीस्वारांवर कारवाई करण्यात येत आहे. दुचाकीस्वारांना दंड केल्यानंतर ज्यांनी अद्याप दंडाची रक्कम जमा केलेली नाही त्यांच्याकडून नाकाबंदी दरम्यान थकित दंड जमा करण्यात येत आहे.

– डॉ. संजय शिंदे, अतिरिक्त पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा

# नकली सोन्याचे बिस्किट घेऊन फिरणारे जेरबंद

▮ पुणे : प्रतिनिधी

नकली सोन्याचे बिस्किट विक्रीसाठी पुण्यात फिरणाऱ्या दोन भामट्यांना गुन्हे शाखा युनिट २च्या पथकाने अटक केली. त्यांच्याकडून पिवळसर धातुचा मुलामा लावलेले एक चांदीचे बिस्किट जप्त केले आहे. महेंद्र जगदिशचंद्र जैन (वय ३३, रा. सोमवार पेठ) आणि सुरेशगिरी गोस्वामी (वय २५, रा. खडकी बाजार) असे अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. त्यांच्याविरोधात बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

शहरातील गुन्हेगारी कृत्याला आळा बसावा, यासाठी विविध गुन्ह्यांत फरार असलेले तसेच शहरातील अभिलेखावरील गुन्हेगारांची गुन्हे शाखा युनिट २ चे पथक तपासणी करीत आहे. दरम्यान, कॅम्प परिसरात दोन व्यक्ती सोन्यासारखा पिवळसर रंगाचा मुलामा लावलेले सोन्याचे बिस्किट खरे आहे, असे सांगून कमी पैशात त्याची विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहेत, अशी माहिती गुन्हे शाखेतील वरिष्ठ अधिकाऱ्यास मिळाली. त्यानुसार पथकाने बनावट ग्राहक तयार करून सापळा रचला. तसेच, आरोपी महेंद्र सुरेशगिरी या दोघांना संशयावरून ताब्यात घेतले. चौकोनी बिस्किट सापडले, ते सोन्याचे आहे, असे सांगत विक्रीसाठी घेऊन फिरत असल्याची माहिती दोघांनी दिली.

केसरी – दि. २७ डिसेंबर, २०१९

# वाहनांची जाळपोळ करणारे दोघे ताब्यात

पुणे : कोथरूड येथील म्हातोबानगर परिसरात रविवारी पहाटे घरासमोर लावलेल्या दुचाकीतील पेट्रोल काढून ते इतर वाहनांवर टाकून त्या पेटवून दिल्याप्रकरणी गुन्हे शाखेच्या युनिट तीनने दोघा बालकांना ताब्यात घेतले. त्यांना पुढील कारवाईसाठी कोथरूड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

म्हातोबानगर येथे दुचाकी पेटवणारे वस्तीतीलच असून ते परिसरातच फिरत असल्याची माहिती पथकाचे सहायक फौजदार दत्तात्रय गरूड व अनिल शिंदे यांना मिळाली. त्यावरून त्यांनी दोघा बालकांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता, मागील महिन्यात दुचाकी चालवताना परिसरात राहणारे सुजित चव्हाण यांच्या मुलाने हुलकावणी दिली होती. त्याचा राग मनात धरून या दुचाकी पेटवल्याचे दोघा बालकांनी कबूल केले. गुन्हे शाखेचे अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंग, सहायक आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र मोकाशी, सहायक निरीक्षक भालचंद्र ढवळे, सहायक फौजदार दत्तात्रय गरूड, कर्मचारी किशोर शिंदे, अनिल शिंदे, रामदास गोणते, राहुल घाडगे, मच्छिंद्र वाळके, गजानन गाणबोटे, संदिप राठोड यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## पिस्तूल व काडतूस बाळगणारा अटकेत

दरम्यान, जनता वसाहतीमध्ये सराईत आरोपी प्रदिप वसंत सावंत (वय–२५, कोंढवा बु. मूळ– सोलापूर) हा पिस्तूल घेऊन आल्याचे पथकातील संतोष क्षीरसागर यांना मिळाली. त्यावरून सावंतला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे १ देशी बनावटीचे पिस्तूल व १ काडतूस असा ४० हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल सापडला. त्याच्यावर दत्तवाडी पोलिसांत गुन्हा दाखल करून ताब्यात देण्यात आले.

# पुण्यात स्थायिक झालेल्या आरोपीस अटक

प्रभात वृत्तसेवा

## विश्रांतवाडी पोलिसांची कामगिरी

येरवडा, दि. २९ - राजस्थान येथील स्वतःची जमीन विकली आणि स्वतः मयत झाल्याचे भासवून भावाच्या मदतीने विकलेली जमीन फसवणूक करून परत घेतलेल्या एकास विश्रांतवाडी पोलिसांनी अटक केली. येरवडा येथे राहत असलेल्या भुरसिंग रणसिंग राठोड याला विश्रांतवाडी पोलिसांनी अटक केली. राजस्थान पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी शोध सुरू करून चार तासांत आरोपीला अटक केली होती. पोलीस नाईक वामन सावंत व पोलीस शिपाई संजय अस्वले यांनी आरोपीच्या १० वर्षांपूर्वीच्या फोटोवरून शांतीनगर परिसरात मुस्तफा भूर राणासिंग नाव बदलून भाड्याच्या खोलीत राहणाऱ्यास अटक करून राजस्थान पोलिसांच्या ताब्यात दिले. सदरची कामगिरी विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक वामन नाईक, संजय असवले यांनी बजावली.

# अभिप्राय...

## - दर्पण विशेष अंक संदर्भात अभिप्राय -

दर्पण म्हणजे आरसा. पोलीसांनी केलेल्या चांगल्या व जनहित कारक कामाचे बाबतीत, प्रसिध्दी माध्यमाकडून नेहमीच दुर्लक्ष केले जाते. अपवादात्मक परिस्थीती वगळता पोलीसांचे लोक कल्याणकारी व चांगले कामास कधीच प्रसिध्दी दिली जात नाही. याउलट एखादया नकारात्मक बातमीस प्रभावीपणे प्रसिध्दी दिली जाते. यामुळे पोलीसांचे कार्यपध्दती बाबत जनमाणसांचे मनात नेहमीच नकारात्मक भावना निर्माण होत होती.

परंतु, मा.पोलीस आयुक्त पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाने, पुणे शहर पोलीसांकडून पोलीसांचे चांगले काम (Good work) बाबतचा दर्पण विशेष अंक प्रसिध्द होत असल्याने पोलीसांचे चांगले कामाची जनतेस आरशाप्रमाणे माहिती उपलब्ध होत असल्याने पोलीसांचे कामकाजाविषयी नागरीकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण होण्यास व पोलीसांची प्रतिमा उंचावणेस नक्कीच मदत होत आहे.

बी.ए.गायकवाड
पो.हवा.ब.नं.४५९०
येरवडा पोलीस स्टेशन पुणे.

---

दि. ३१/०६/२०२३
भारती विद्यापीठ पो.स्टे.
पुणे

नाव:- सुनिल यादवराव देशमाने
पो.हवा. ४४०६, भा.वि.पो.स्टे. पुणे

विषय:- पुणे शहर पोलीस दलातील दर्पण पुस्तिकेच्या अभिप्राय बाबत.

महोदय,

सन २०१८ या वर्षापासून मा. पोलीस. आयुक्त सो. यांनी दर्पण पुस्तकाचा उपक्रम अविरत चालू ठेवला आहे.

या मासिकामध्ये असणाऱ्या पेपर कटींग व बातम्या या वरुन पो. ठाणे येथे येणारे जन. नागरीक तसेच पो. अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या स्थानकातील आपल्या सहकारी अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबाबत माहिती मिळते तसेच आपण कोठेतरी चांगल्या गोष्टी करण्यास यावरुन प्रोत्साहन मिळते तसेच आपण करीत असलेल्या कामात कोठेतरी बदल करावा असे प्रत्येक पो. अधि. व कर्मचारी यांना मार्गदर्शन या पुस्तकाद्वारे मिळत आहे.

मा. सा. रवाने

(स. य. देशमाने)
HC ४४०६


MPSC aspirant, his friend held for finance co robbery
Ex-director of IT firm held for data robbery
पोलिसांच्या दक्षतेमुळे मिळाली दागिन्यांची पिशवी
अवैध धंद्यांची यादी पोलीस वेबसाइटवर जाहीर
एस्कॉर्टसाठी तरुणी पुरविणाऱ्यास अटक
दोन सोनसाखळीचोरांना अटक
'सेल्फी'वरून काढला आरोपींचा माग
Cyber police crackdown on 2K bank accounts in Rajasthan
नववर्षाच्या स्वागतासाठी पोलीसही झाले सज्ज
सराईत गुन्हेगार जाळ्यात
'उत्तम संवाद हा मुलांचे भविष्य घडविण्याचा राजमार्ग'
तरुणाच्या खुनातील सहा आरोपी अटकेत
शहर पोलीस करणार चिंतामुक्त ड्यूटी
पोलीस दलाकडे विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी शाळांमध्ये कवायत
13,000 offenders booked for drink driving in 2019
2 detained for questioning in MBA grad murder case
WHAT HAPPENED?
मोबाईल अचानक बंद पडतो तेव्हा!
सायबर गुन्ह्यांबाबत आता विद्यार्थ्यांसाठी जागरूकता अभियान